॥अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

## (Election Branch - निवडणूक शाखा)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र. उमवि/२/निवडणूक/१७/२०१७ दि.१६/०६/२०१७

प्रति,

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या**
**सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य**
**तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.**

**विषय :** विद्यापीठाच्या नोंदवहीत नांवे नोंदविण्यासाठी तसेच नोंदणीकृत पदवीधर म्हणून मतदार यादीत नांव समाविष्ट करण्यासाठी संपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह स्विकृत करणेबाबत......

महोदय,

आपणांस विदीतच आहे की, पदवीधरांची विद्यापीठाच्या नोंदवहीत नांव नोंदणी करण्याकरिता व नोंदणीकृत पदवीधराच्या मतदार यादीत नांवे समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठाने जाहीर प्रकटन विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केले असून, जाहीर प्रकटनात नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयात **दिनांक १९/०६/२०१७ ते दिनांक ०६/०७/२०१७** या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत **सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत** स्विकृत करण्यांत यावेत.

अर्ज स्विकृतीसाठी आपण जबाबदार कर्मचा-यांची नियुक्ती करावी. संबंधित पदवीधर ऑनलाईन माहिती भरतील. माहिती भरलेल्या अर्जांची प्रत व पोचपावती ह्यांच्या प्रती काढून त्या आपल्याकडेच स्विकृतीसाठी सादर करतील, तेव्हा अर्ज स्विकृत करतांना खालीलप्रमाणे काळजी घ्यावी.

**(A) नव्याने नोंदणी करणा-या पदवीधारकांकडून खालील कागदपत्र स्विकारावीतः-**

१) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरुन "Application for Registration of Graduates" ची छापील प्रत. (अर्जावर पदवीधराची दोन ठिकाणी स्वाक्षरी असणे आवश्यक राहील.)

२) छापील अर्जासोबत स्वयंस्वाक्षांकीत पदवी प्रमाणपत्र.

३) निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधा-पत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) या पैकी एका पुराव्याची स्वयंस्वाक्षांकीत प्रत.

४) नांव बदललेले असल्यास स्वयंघोषणापत्र व त्याअनुषंगाने पुराव्याची स्वयंस्वाक्षांकीत प्रत.

*पान क्र.०२ वर .. .. ..*

**(B)** २०१५ मध्ये नोंदणीकृत पदवीधरांच्या यादीत नोंदणीसाठी व मतदार यादीत समावेशनासाठी अर्ज केलेले व वैध ठरविण्यांत आलेल्या पदवीधरांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**(C)** २०१५ पूर्वी ज्यांनी नोंदणी केलेली आहे, तथापि, २०१५ मध्ये मतदार यादीत समावेशनासाठी अर्ज केलेला नाही, अशा पदवीधरांसाठी:-

१) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरुन "Application for Enrollment in the Electoral roll of Registered Graduate" ची छापील प्रत (अर्जावर पदवीधराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.)

२) निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधा-पत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) या पैकी एका पुराव्याची स्वयंस्वाक्षांकीत प्रत.

३) नांव बदललेले असल्यास स्वयंघोषणापत्र व त्याअनुषंगाने पुराव्याची स्वयंस्वाक्षांकीत प्रत.

**(D)** वरीलप्रमाणे अर्जासोबत छपाई करण्यांत आलेल्या पोचपावतीवर अर्ज स्विकृती केंद्राचा शिक्का मारुन त्यावर तेथील प्रतिनिधीने सही करावी व त्याची एक प्रत विद्यार्थ्यास द्यावी आणि एक प्रत स्विकृती केंद्रावर अर्जासोबत जोडून जमा करावी.

**(E)** अर्ज स्विकृत करतांना प्रती अर्ज रुपये १२/- रोख स्वरुपात स्विकारावेत. या शुल्काची नोंद खालील तक्त्यात नोंदवहीत करावी.

| अ.क्र. | दिनांक | पदवीधराचे नांव | पत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

महाविद्यालयाने प्रती अर्ज रुपये २/- स्वतःकडे ठेवून उर्वरीत शुल्क प्रती विद्यार्थी रुपये १०/- ह्या प्रमाणे जमा करावेत. शुल्काचा एकत्रित डिमांड ड्राफ्ट (डी.डी. कमिशन वजा करुन) वित्त व लेखा अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, यांच्या नांवे काढावा. नोंदवही, अर्ज व शुल्काचा डिमांड ड्राफ्ट विद्यापीठाच्या निवडणूक शाखेत **दिनांक ०७/०७/२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर करावी.**

**(F)** अपूर्ण अर्ज कोणत्याही परिस्थतीत स्विकारु नये.

आपला विश्वासू,

(प्रा.अ.बा. चौधरी) 16/6/17

प्र.कुलसचिव तथा

निवडणूक निर्णय अधिकारी,

उ.म.वि., जळगांव.